**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज**

द्वितीय अपिल क्र.रामाआ /५३९२/२०२३ /पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे - १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| अनिल दत्तात्रय पल्ली | विशेष विक्री व वसुली अधिकारी, सोलापूर नागरी औद्योगिक सहकारी बँक, सोलापूर | मा.अवसायक, सोलापूर नागरी औद्योगिक सहकारी बँक, सोलापूर |

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचेकडे दि.२९.०८.२०२३ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. द्वितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपीलार्थी यांनी माहिती अर्जानूसार खालील प्रमाणे माहिती मागीतलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशील |
|---|---|
| ३१.०५.२०२३ | मे २०२३ व नोटीस बजावल्याची तारीख अखेर बँकेत जप्त केलेल्या स्थावर मालमत्ताचा ताबा घेणेसाठी दिलेल्या तारखांना बजावणी केलेल्या नोटीशीची पत्र मिळणेबाबत. |

अपिलार्थी यांनी दि.२४.०३.२०२५ रोजी अर्ज करून आयोगास असे कळविले आहे की, प्रस्तुत प्रकरणात माहिती प्राप्त झाली असलेने सदरचे अपिल निकाली काढण्यात यावे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

अपिलार्थीच्या विनंतीवरुन सदरचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( मकरंद रानडे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

जावक क्र.रामाआ / ५३९२/२०२५ /पुणे 8427/2025 दिनांक - 16/6/2025